
प्रकरण तिसरे

# रा. ना. पवारांच्या कवितेतील अभिव्यक्ती सौंदर्य



## प्रकरण तिसरे

# रा. ना. पवारांच्या कवितेतील अभिव्यक्ती सौंदर्य

कवी रा. ना. पवार यांनी विविध विषयांवर कविता लिहिल्या. काव्य, भक्ती, प्रीति, समाजकारण, राजकारण अशा विषयावर त्यांनी ज्या कविता लिहिल्या त्या साऱ्या अनुभवातून व्यक्त झाल्या आहेत. या कवीचे मन संवेदनशील असल्याने वैयक्तिक जीवनात व समाजजीवनात ज्या ज्या वेळी मनाला अस्वस्थ करणाऱ्या किंवा प्रसन्न करणाऱ्या घटनांचा त्यांना अनुभव आला, त्यावेळी त्यांनी आपल्या मनातील विचारांना, भावनांना काव्यरुप दिले. ही कवितेची अभिव्यक्ती अनुभवातून झालेली असल्याने तिच्यात एक प्रकारचा उत्कटपणा व प्रामाणिकणा आढळतो. आपल्या मनातील भावना व विचार व्यक्त करताना त्यांनी कवितेचे माध्यम वापरले. हे त्यांच्या कवीप्रवृत्तीचे, काव्यप्रेमाचे द्योतक होय. आपण कवी आहोत. आपल्याला कवी व्हायचे आहे, कवी म्हणून समाजात नाव मिळवायचे आहे ही त्यांची भूमिका कधीच नव्हती. तथापि, बालपणापासून त्यांना शब्दांचे वेड होते. ते वेड का निर्माण झाले याबद्दल त्यांनी दिलेली आठवण अर्थपूर्ण आहे. ते म्हणतात, ''माझ्या बहिणीच्या घरी अक्कलकोटला राहात असताना 'व्युत्पत्तिप्रदीप' हे पुस्तक आढळले. त्या पुस्तकात शब्दांची निर्मिती कशी होते याची सुरेख माहिती दिली होती. मी हे पुस्तक पुन्हा पुन्हा वाचून आत्मसात केले. त्यानंतर वा. गो. आपटे यांचे 'शब्दरत्नाकर' हे पुस्तक वाचनालयात आढळले. हे पुस्तक मला फार आवडले की ते चोरुन ठेवण्याचा मोह झाला होता.''[१] यामुळे शब्दांचा त्यांना छंद लागला. तसेच बालपणापासूनच भजन, कीर्तन गायन व संगीत यांच्याविषयीही प्रेम निर्माण झाले. शब्दप्रेम, संगीतप्रेम आणि अनुभव या सर्वांच्या मिलाफातून रा. ना. पवारांची कविता आकारत गेली, विकसित होत गेली. म्हणून डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी म्हटले आहे, ''त्यांची कविता अनुभवातून आणि अभ्यासातून घडलेली रससिद्ध कविता होती पण खटपटीच्या रस्त्याने चालणं रा. नां. च्या वृत्तीला कधीच मानवणारं नव्हतं.''[२] त्या दृष्टीने रा. ना. पवारांची 'मुलगी दाखवावी म्हणतो' (पृ. ६९) ही कविता अर्थपूर्ण वाटते. मुलीच्या रुपकातून ते कवितेविषयीच आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या काव्यकन्येला आधुनिकतेची आवड नाही. ती साधी सुधी पण सौंदर्यपूर्ण आहे. त्यांच्या शब्दांत सांगायचे तर-

''रस, नाद, लय, ताल, यात तिला गम्य आहे
तिला पाहून रसिकता म्हणजे तिचं रुप रम्य आहे
प्रतिभेने फुलते अलंकाराने सजते
ओज तेजाने प्रकाशते, प्रसादाने प्रसन्न होते
शृंगाराचा साज लेवुन शालीनतेला जपते

अशी आमची दुहिता
तिचं नांव कविता.'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७०)

त्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांची कविता शृंगारापेक्षा शालीनतेला अधिक जपते. त्यामुळे त्यांची कविता साधी, सोपी, प्रासादिक अशी बनली आहे. तरीही त्यांच्या कवितेत अभिव्यक्तीची अनेक वैशिष्ट्ये आढळतात.

**भावाविष्काराचे सौंदर्य :**

**आर्त भक्तिभावना :**

रा. ना. पवारांची कविता आशयाने संपन्न आहे. त्याचप्रमाणे भावसौंदर्यानेही संपन्न आहे. त्यांच्या कवितातून विविध भावनांचा आविष्कार झालेला आढळून येतो.

भक्ती हा त्यांचा अनुभवाचा व आवडीचा विषय आहे. त्यामुळे त्यांनी भक्तिगीते लिहिली आहेत. 'सावळ्या विठ्ठला', 'नका विचारु देव कसा', 'क्षणभर उघड नयन देवा',' देवा बोला हो माझ्याशी', 'भेटतील श्रीराम',' चल ये रे श्रीरंगा' या भक्तिगीतातून भक्तिभावनेचा उत्कट आविष्कार झाला आहे. देव दर्शनासाठी व्याकुळ झालेल्या भक्तांची आर्तता साध्याच पण सुंदर शब्दांत व्यक्त करताना ते म्हणतात-

''सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले
विसरुन गेले देहभान ॥
गोजिरे हे रुप पाहुनिया डोळां
दाटला उमाळा अंतरी माझ्या ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ.१)

भक्ताला भावनेप्रमाणे देव दिसतो म्हणून कवी म्हणतो-

''नका विचारु देव कसा
देव असे हो भाव तसा'' (सावळ्या विठ्ठला, पृ.२)

दर्शनासाठी व्याकुळ झालेले भक्ताचे मन म्हणते-

''क्षणभर उघड नयन देवा ॥
करावया तव मंगल पूजा
देहदीप मी जाळिन माझा

भावभक्तीचा हा नजराणा
स्वीकारुनी घ्यावा ॥''          (सावळ्या विठ्ठला, पृ.३)

या कवितेत 'देहदीप, धूप, भक्तिचा नजराणा' या शब्दांतून त्यानी भक्तिभावनेचा आविष्कार केला आहे. अशीच आर्तता 'देवा बोला हो माझ्याशी' या ही कवितेतून व्यक्त झाली आहे.

भक्तिगीतांतून भक्तिभावनेचा आविष्कार झाला आहे. तसाच तो इतर कवितेतूनही झाला आहे. नामस्मरणाने 'श्रीराम भेटतील' अशी श्रद्धा असलेल्या रामभक्ताचा मनाने 'भेटतील श्रीराम' (पृ.५) या कवितेत केलेले चित्रण रामभक्ती दाखविते. अशाच रामभक्तिचा आविष्कार 'लक्ष्मणा डोळे पूस तुझे' (पृ.६) या कवितेत आढळते. तर 'चल ये रे श्रीरंगा' (पृ.५७) या कवितेत कृष्णभक्तिचा आविष्कार झाला आहे. विठ्ठलभक्ती, रामभक्ती व कृष्णभक्ती ही एकाच भक्तिभावनेची विविध रुपे आहेत. कवीच्या मनात देव-देवताविषयी भक्ती आहे. तशी त्या देवाचे दूत असलेल्या साधुसंत व महात्मे यांच्याविषयीही कवीच्या मनात अपार भक्ती आहे. तिचा आविष्कार 'आचार्य अत्रे', 'ज्ञानियांचा राजा', 'समर्थ रामदास स्मृती', 'स्वामी दयानंद', 'लो. टिळक स्मरण', या कवितातून झाला आहे. ज्ञानेश्वरांविषयी कवीच्या मनात अत्यंत आदर असल्याने कवी म्हणतो-

''भक्ती गंध आर्त सरल हृदय
मुक्तीचे पाथेय कधी लेसी
उदात्तसुंदरा अध्यात्माचा ध्यास
लावोनी गेलास उठलठी
    ज्ञानीयांचा राजा तुझी एक ओवी
    अंतरी रुजावी हीच मुक्ती.'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७४)

ज्ञानेश्वरांच्या ज्ञानाबद्दल कवीला आदर वाटतो तसाच समर्थ रामदासाच्या कर्तृत्वाबद्दलही वाटतो. समर्थ रामदासांनी जनजागृती केली, शिवाजीला प्रेरणा दिली आणि 'महाराष्ट्र वैरवरी फुलवली' म्हणून कवीला रामदासाविषयी आदर वाटतो. या थोर पुरुषांविषयी कवीच्या मनात जो कृतज्ञताभाव आहे तो भक्तिभावनेचा एक सुंदर आविष्कार आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरु नये.

**शालीन शृंगार भावना :**

रा. ना. पवारांच्या कवितेत उत्कटपणे व्यक्त झालेली दुसरी भावना म्हणजे प्रेम व शृंगार होय. या भावनांचे ते मोकळेपणाने चित्रण करतात. त्यात थोडासा खट्याळपणाही आलेला आहे.

'रूप तुझं डोळ्यांत', 'स्वर्ग सुखाचे दोनच क्षण','आज पुनवेची रात', 'मी आले आंघोळीला', 'नका गडे गालात हसू', 'सांग कुठे शिकलीस?', 'आज नाहीचं का बोलायचं' या प्रेम कविता त्या दृष्टीने अर्थपूर्ण वाटतात. या कवितातून प्राधान्याने शृंगाराचे चित्रण आले असले तरी त्याला प्रेमभावनेची जोड दिली असल्याने या कवितातून आलेला शृंगार 'शालीन' बनला आहे. उदा.

'रुप तुझं डोळ्यांत' या कवितेतील प्रेयसी प्रियकराला भेटायला रानात येते. त्यावेळी अधीर झालेला प्रियकर तिच्याशी खोड्या करतो म्हणून ती म्हणते-

''वाऱ्यानं उडतो रे माझा पदर
पाहू नको तूं रोखून नजर
धटिंगणा काय म्हणू आतां तुला?
जीव माझा घाबरला, सांगु इथं कोणाला?
सोड मला दया कशी नाही तुला.''(सावळ्या विठ्ठला, पृ.५४)

तर 'स्वर्ग-सुखाचे दोनच क्षण'(पृ. ५५) या कवितेत एकांतात भेटलेल्या प्रेमीयुगलांचे सूचक चित्रण केले आहे. मीलनाचा क्षण त्यांना स्वर्ग सुखाचा क्षण वाटतो. याहीपेक्षा 'आज पुनवेची रात' (पृ.५८) या कवितेत उत्कट शृंगार प्रतिकात्मक भाषेतून व्यक्त केला आहे. 'तुफान आलेल्या संमिदरात, तिचा तारू डुलू लागला' अशा शब्दांत तारुण्यांच्या उन्मादाचे सूचक चित्रण केले आहे. त्याहीपेक्षा अधिक सूचकता खालील वर्णनात दिसून येते-

''सुरुं लाटांचा धिंगा
दोघे घालू ये पिंगा
चल चल सारंगा
जरी उलटलं तारु समिंदरात
माझ्या जिवाचं तारुं तुझ्या हातांत
अर तांडेला वल्हव भरारा थांबू नको!
नाव समिंदरात माझी लोटू नको!'' (सावळ्या विठ्ठला, पृ.५८)

या कवितेतील नायिकेची समर्पनशीलता 'माझ्या जीवाचे तारु तुझ्या हातात' या ओळीतून व्यक्त झाली आहे. 'मी आले आंघोळीला'(पृ.५९) याही कवितेत प्रियकर-प्रेयसीच्या भेटीचे खट्याळ चित्रण केले आहे. असेच चित्रण 'नका गडे गालात हसू' (पृ.६०) या कवितेतही आढळते. उदा-

''प्रणय-रसाला भरते आले

घेऊ भराभर भरुनी प्याले
भानावरि जरि असू नसू!
नका गडे गालात हसूं!''          (सावळ्या विठ्ठला, पृ. ६०)
...
''मारुनि टिचकी गालावर अशी
धरिता मजला कां करपाशी
पाहिल कुणि या दूर बसूं।
नका गडे गालात हसूं।''          (सावळ्या विठ्ठला, पृ.६०)

येथे शृंगारातील मोकळेपणा जाणवतो. अशाच मोकळेपणाच्या भावनेतून पती-पत्नीच्या शृंगाराचे 'आज नाहीच का बोलायचे?'' (पृ.६५) या कवितेत चित्रण केले आहे. पत्नी एकांतात भेटायला येत नाही, म्हणून रुसलेल्या नवऱ्याला सांगते, की घरात सासू-सासरे असताना विडा, चहा कसा आणून देऊ? आज मात्र घरात कुणी नाही म्हणून-

''आता कुणीही नाहीं घरांत
मिळे क्षणाचा हा एकांत
विडा आणला मी ओठात
    गडे दार तरी लावायचं?
    आज नाहींच का बोलायचं? ''     (सावळ्या विठ्ठला, पृ.६५)

शृंगाराचे वर्णन करताना कवी काही वेळेला खट्याळपणाची भावना कशी अभिव्यक्त करतो. हे या कवितातून दिसते.

शालीन प्रेम-शृंगार यांच्या चित्रणाबरोबर कवीने प्रेमभावनेतील विरहाचे काही वेळेला उत्कट चित्रण करतो. उदा.-

''स्वप्न मंदिरी प्रीत-फुलांचा
    हार करी माझ्या सुकला
वाट पाहुनी डोळे शिणले
    अश्रू नयनीं ओघळला''     (सावळ्या विठ्ठला, पृ.६६)

अशाच विरहाचे भावपूर्ण चित्रण 'चल ये रे श्रीरंगा' (पृ.५७) या कवितेत आढळते. श्रीकृष्णाची वाट

पाहून थकलेली राधा-गौळण आपल्या विरह व्याकुळतेचे वर्णन करताना म्हणते-

''घनश्यामा गोविंदा
ना सूचे कामधंदा
तुजविण भासे सुनें सुनें
मनमंदिर माझे रे
वृंदावनिं ये रे!'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५७)

अशा प्रकारे प्रेम, शृंगार व विरह यांचे भावपूर्ण चित्रण केलेले आढळते.

**राष्ट्रभावना :**

रा. ना. पवारांच्या कवितेतील आणखी एक उत्कट भावना म्हणजे राष्ट्रभक्ती होय. बालपणापासूनच त्यांना राष्ट्रभक्तिचे आकर्षण होते. सन १९४२ च्या आंदोलनात राष्ट्रीय स्वातंत्र्य, राष्ट्रीय नेते, राष्ट्रध्वज, राष्ट्रवीर अशा विविध विषयावर त्यांनी ज्या कविता लिहिल्या आहेत, त्यातून आज त्यांच्या राष्ट्रभक्तिचा प्रत्यय येतो. 'माझ्या संभ्रम मिटेल कां?','दुदुंभी रणाची आज भारती वाजे', 'अखेरचे पत्र', 'सीमेवरच्या बहादुरांनो', 'राष्ट्रध्वज उंच धरू',' हे वंदे मातरम् गीता', 'सोनं झालंया स्वस्त', 'स्वामी दयानंद', 'लो. टिळक स्मरण',' ते हास्य आज मावळले', इत्यादी कविता पाहिल्या की या कवीच्या मनात राष्ट्रभक्ती किती उत्कट होती. याचा प्रत्यय येतो.

सोलापुरला सन १९३० मध्ये 'मॉर्शल लॉ' विरोधी जी चळवळ झाली. त्यात चार हुतात्म्यांने बलिदान केले. त्यांचा त्याग कवीला वंदनीय वाटतो, पण त्या पार्श्वभूमीवर आजच्या पुढाऱ्याची स्वार्थीवृत्ती तिरस्करणीय वाटते आणि त्यामुळे स्वातंत्र्यपूर्वकाळातील व स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणाचे त्यांनी या कवितेत चित्रण केले आहे ते लक्षणीय आहे. आजच्या भ्रष्ट राजकारणाचा त्यांनी उपहास केला आहे. उदा.

''तेव्हा पोटाच्या पत्रावळीची मोट झाली नव्हती
अन्नाशिवाय 'इतर काही' खायची सवय झाली नव्हती.''(सावळ्या विठ्ठला, पृ.२०)

...
''तेव्हाचं रक्त सभेपुरतं सळसळत नव्हतं
तिकिट नाकारल्यावर जळफळत नव्हतं

कारण तेव्हा तिकिटच नव्हतं.''　　　(सावळ्या विठ्ठला, पृ. २०)

या उपहासातून कवीच्या स्वातंत्र्यप्रेमी मनाला होणाऱ्या वेदना जाणवतात. आजच्या पुढाऱ्याविषयी उपहासाने चित्रण करणाऱ्या कवीची शैली, हुतात्म्याचे चित्रण करताना आक्रमक बनते. वीररसाचा आविष्कार करते. उदा-

''आज तेज बल तुझे पाहुनी राष्ट्र उभे दिपले
किती हृदयांतुनि देशभक्तिचे वारे संचारले.''(सावळ्या विठ्ठला, पृ.४४)

हे गीत म्हणजे गुलामगिरीच्या काट्यांमधून फुललेले फुल आहे तरी, सत्ताधाऱ्यासाठी मात्र ते काटा होते. अशी एक सुंदर कल्पना मांडली आहे.

त्यांच्या कवितेतून राष्ट्रभक्तिचा ज्वलंत आविष्कार आढळतो. तो त्यांच्या 'संग्रामगीता'तून सन १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्यानंतर त्यांनी 'संग्रामगीते' लिहिली. त्यातून आक्रमणाचा प्रतिकार व स्वातंत्र्याचा निर्धार या भावना व्यक्त झाल्या आहेत. त्याचबरोबर या गीतांतून विविध रसांचा आविष्कार झाला आहे. या दृष्टीने 'दुदुंभी रणाची आज भारती वाजे'(पृ.७) ही कविता अर्थपूर्ण आहे. ही केवळ कविता नाही तर स्वातंत्र्यशाहीरांनी गायिलेला पोवाडा आहे. रा. ना. पवारांच्या ठायी शाहीराची प्रतिभा होती. यांचा प्रत्यय या कवितांतून येतो. त्या दृष्टीने पुढील ओळी अर्थपूर्ण आहेत. कवी आवेशाने म्हणतो-

''ऐका हो गुणी शाहिरा छंदी मुशाफिरा
लेखणी धरा कवन करा ताजे
दुदुंभी रणाची आज भारती वाजे
जुने नवे खंदे शाहीर, त्यांनी रणावर
शब्दांचे तीर सोडिले मौजे
म्हणूनीच तयांचे नांव अजुनही गाजे''
नका गाऊ आजला इष्काची थोरवी
देतिल स्फुर्ति अशि कवने काढा नवी
अशी वीरवृत्तिची आज शाहिरी हवी
डफ घुमवून फडं गाजवा, काढा वग नवा
देश जागवा, शाहिरी राजे
दुदुंभी रणाची आज भारती वाजे''　　　(संग्रामगीते पृ. ७)

स्वातंत्र्यरक्षणासाठी सैनिक आपल्या सर्वस्वाचा त्याग करतात. म्हणून कवीला सैनिकांबद्दल अपार आदर वाटतो. म्हणून कवी म्हणतो-

''देव्हाऱ्यातील देवाइतुके मंगल तुमचे नाम
स्वातंत्र्याच्या पुजेआंधी घेऊ तुमचे नाम'' (संग्रामगीते, पृ.५)

या राष्ट्रीय भावनेतून त्यांनी काही बालगीतेही लिहिली आहेत. 'मायभूमीची सेवा करुं दे थोडी' (पृ.१०) 'दुष्ट शब्द तो नको चिनी'(पृ.१३), 'चिनी माऊचा बोका'(पृ.१९) हे बालगीते वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. एक बालक आपल्या आईला म्हणतो-

''आई दे मज खाकी टोपी, शर्ट आणखी चड्डी
बंदुक घेउन नरम करीन मी चिनी शत्रूची हड्डी!''(संग्रामगीते, पृ.१०)

दुसऱ्या एका कवितेतील बालक म्हणतो -

''भिंतीवरुनी घरांत येईल चिनी माऊचा बोका
दुधास अपुल्या धोका- याला मिळे त्यानें ठोका!''(संग्रामगीते, पृ.१९)

लोकगीतांच्या धर्तीवर 'देश माझा ग सोन्याचा' (पृ.२१) हे लिहिलेले गीतही अर्थपूर्ण आहे. या कवितेतील स्त्री म्हणते-

''देश माझा गं सोन्याचा    पृथ्वीच्या मोलाचा
घाला त्याच्यावरी आला    आला गं शत्रूचा।''    (संग्रामगीते, पृ. १९)

...

''ऊठ ऊठ माझ्या बाळा    देशावर आला घाला
झोपू नको अशा वेळी जाई र लढण्याला।''(संग्रामगीते, पृ.२१)

अभंग, ओवी, पोवाडा, बालगीते, लोकगीते अशा विविध प्रकारातून राष्ट्रीय विषयावरची गीते लिहून एक वेगळा काव्यप्रकार केला आहे.

**इतर भावना :**

भक्ती, राष्ट्रप्रेम, शृंगार या भावनाबरोबर त्यांनी इतर काही भावनांचा आविष्कार केला आहे.

**करुणभावना :**

'आज भोंगा वाजत आहे' (पृ.२९) 'अखेरचे पत्र' (पृ. ४१)'हरिणी आणि पाडस' (पृ.४९) या कवितांतून कवीने करुणरसाचा सुंदर आविष्कार केला आहे.

'आज भोंगा वाजत आहे' (पृ.२९) या कवितेत गिरणी बंद पडल्याने एका मजूराच्या कुटुंबाची वाताहत कशी झाली. याचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे. तर 'अखेरचे पत्र' (पृ.४१) मध्ये देशाच्या संरक्षणासाठी रणांगणावर युद्ध करणाऱ्या सैनिकांच्या मनातील कुटुंबप्रेम व राष्ट्रप्रेम यातील संघर्ष करुणरसाने ओतप्रोत भरलेला आहे. आपल्या अखेरच्या पत्रात तो म्हणतो-

''क्षणाक्षणास येवुनी स्मृती मनांत तेथली
कधी तुझी सुहासिनी समोर मुर्ति पाहिली
कधी मनांत वाजली चिमुकलीच पाउले
अखेरचेंच पत्र हें ठरेल काय प्रेमले?'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ४१)

करुणरसाचे आणखी एक चित्रण 'हरिणी आणि पाडस' (पृ. ४९) या कवितेत आढळते. एक हरिणी आपल्या पाडसासह अरण्यांमध्ये स्वच्छंदपणे हिंडते, पण एके दिवशी तिची पारध होते. तेव्हा-

''झुडपामध्ये पाडस लपले वाचवुनी प्राण
परंतु इकडे भूवर पडली हरिणी निष्प्राण
चार माणसे हरिणीला त्या नेती उचलोनी
झुडपामधुनी बघते पाडस भिजाऱ्या डोळ्यांनी'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ४९)

हे वर्णन म्हणजे स्वभावोक्ती अलंकाराचा एक उत्कट नमुना होय.

**वात्सल्यभावना :**

काही कवितातून झालेला वात्सल्यभावनेचा आविष्कारही हृदयस्पर्शी झाला आहे. 'आज भोंगा वाजत आहे' (पृ.२९) 'माझा गुरु'(पृ.६३) 'लेकीची लावणी' (पृ.५0) 'हरिणी आणि पाडस' (पृ.४९) या कवितांतून वात्सल्याची सुंदरचित्रे रेखाटली आहेत. 'आज भोंगा वाजत आहे' (पृ.२९) या कवितेत आपल्या मुलासाठी तडफडणाऱ्या आईच्या मनाचे दर्शन घडविते तर 'हरिणी आणि पाडस' मध्ये निरागस पाडसाला आपल्या आईचा मृत्यू पहावा लागतो. पण यात वात्सल्याचा अत्यंत सुंदर आणि उत्कट आविष्कार झाला आहे तो 'लेकीची लावणी' या कवितेतील बापाचे आपल्या लेकीवर उत्कट प्रेम आहे. तिच्या लग्नानंतर ती आपल्याला सोडून दूर जाणार म्हणून त्याला दुःख वाटते

आणि लग्न होऊन आपला स्वतंत्र संसार थाटणार म्हणून आनंद वाटतो. अशा द्विधा मनस्थितीत हा बाप म्हणतो-

''लाडाची ही पोर, चंद्राची गं कोर, नेईल कुणी चोर
हिरकणी ही माझी हिरकणी ही'' (सावळ्या विठ्ठला, पृ.५०)

लग्नानंतर लेकीला दिवस जातात तेव्हा पुन्हा त्याला एका वेगळ्याच भावनेचा प्रत्यय येतो. त्यात नाट्यमयतेने कवीने म्हटले आहे-

''व्हटात बोलतंय, एकलच हसतय सुखात नांदतय
समजायचं तुमचं लेकरु हो
गोडकडू लागतय आंबट मागतय ढवाळ लागलय
समजायचं तुमच्या मैनेला हो
चंद्राचा मुखडा काळजाचा तुकडा
वटीत खेळवा नातीला
आजा नातीला धरतोय छातीला'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५१)

वात्सल्यरसाचा इतका उत्कट व सुंदर आविष्कार असणारी कविता मराठीत एकमेव असेल असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरु नये. शब्दसौंदर्य अणि भावसौंदर्य यांच्या मिलाफातून ही कविता साकार झाली आहे.

**हास्यभावना :**

रा. ना. पवारांच्या कवितेत हास्यरसाचाही काही कवितातून आविष्कार झाला आहे. 'नकलाकार' हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा कसा विशेष होता, या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणातून स्पष्ट होते. आचार्य अत्र्यांच्या संस्कारामुळे रा. ना. पवारांच्या व्यक्तिमत्वात एक विनोदी व विडंबनकार माणूस लपलेला होता. त्यामुळे अनेक कवितांतून त्यांनी कधी उपरोधाने तर कधी उपहासाचे मजेशीर चित्रण केलेले आढळते. आजच्या पुढाऱ्याचे व राजकारणाचे 'माझा संभ्रम मिटेल का?' या कवितेत केलेले चित्रण मजेशीर आहे. त्यांनी म्हटले आहे-

''तेव्हा गांधी टोपीला कुणी टोपी घातली नव्हती
साधी भोळी गांधी टोपी वाकडी तिरपी झाली नव्हती
झोकदार टोकदार फॅशनवाली झाली नव्हती.'' (सावळ्या विठ्ठला, पृ. १९)

आज महापुरुषांचे पुतळे उभे केले जातात,परंतु त्याचे पावित्र्य राखले जात नाही. म्हणून याच कवितेत उपहासाने त्यांनी म्हटले आहे-

''पुतळ्यांची रांग लागली
पाखरांची सोय झाली''     (सावळ्या विठ्ठला, पृ.२२)

'कोंबडा' कवितेत रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवरच्या गर्दीचे व प्रवासाचे चित्रण मोठे गमतीदार आहे. त्यांनी म्हटले आहे-

''तोच कुणीतरी पावना आला फलाटावरुन बोलता झाला
साहेब थोडं ऐकताव का? गाडी थांबवून धरताव कां?
सामान समदं उतरुन झालं परंतु साहेब विपरित झालं
एकदोन लेकरं सापडत नाहीत बायको अन् मेव्हणी दिसतच नाहीत
तोच लांबुन आली हाक, 'कारभारी आम्ही हिकडं हाव
समदीं लेकरं बरोबर हायती तुमचीच आम्हाला धास्ती होती
त्याची त्याला चूक कळली, गार्ड हसला, गाडी ढळली.'' (सावळ्या विठ्ठला, पृ.२६)

याहीपेक्षा हास्याचा उत्कट आविष्कार या कवितेमध्ये झाला आहे, तो 'पावना मी खेड्यामधला',(पृ.६२) ही कविता विनोदी आहे ,पण त्याचबरोबर विनोदाच्या माध्यमातून शहरी जीवनाच्या कृत्रिम संस्कृतीवर भाष्यही आहे. त्यामुळे या कवितेला अर्थपूर्णता प्राप्त होते. उदा-

''मुंबईत पैशाला हो काडीचीबी किंमत नाही
पान्यावानी पैसा जातो कसा त्येच समजत नाही
एक गिलास पानी मिळतय पाच पैशाला''     (सावळ्या विठ्ठला, पृ.६२)

'आज नाहीच का बोलायचे?' (पृ.६५) या कवितेत पत्नी व पतीला एकांतात भेटायला येते. इतर वेळेला कुणी ना कुणीतरी आल्याने त्यांना एकांत मिळत नाही. एकदा एकांत मिळाला पण त्यावेळी साध्या भोळ्या नवऱ्याला दरवाजा लावायचं देखील भान राहत नाही. म्हणून ती म्हणते-

''विडा आणला मी ओठात
गडे दार तरी लावायचं?''     (सावळ्या विठ्ठला, पृ. ६५)

'मुंबईची चाळ'(पृ.६७) ही संपूर्ण कविता पाहिली की रा. ना. पवारांच्या ठायी किती उत्तम प्रकारची विनोदप्रियता होती याचा प्रत्यय येतो. याही कवितेत विनोदाबरोबर सामाजिक चित्रण आढळते.

येथे विनोदाला गांभीर्याची जोड आहे. याचा प्रत्यय खालील ओळीतून येतो-

''एकच खोली दहादहाची आणि लोक वीस
त्या वीसाचे दरवर्षाला होति पंचवीस''

...

''त्या चाळीचा जिना मनोहर वाहवा क्या बात!
त्याच्यापुढती लक्ष्मण झुला असे क:पदार्थ''

...

''फक्त चारशे पौंडाची कुणि बाला नाजूक
जिन्यात येतां सुरुं होतसे वन वे ट्रॅफीक'' (सावळ्या विठ्ठला; पृ.६७)

...

''वरुनी भरकन कचरा आला वाऱ्यावर खाली
हवी कशाला टालकम पावडर लावाया गालीं.''

...

माडीवरचे व्रात्य कारटे गंम्मत करि एक
तोच खालच्या भटजीला मग होई अभिषेक'' (सावळ्या विठ्ठला, पृ.६८)

अशा प्रकारे रा. ना. पवारांच्या कवितेत विविध भावनांचा आविष्कार झालेला दिसून येतो. त्या भावना पाहता असे दिसून येते की, भक्ती, राष्ट्रभक्ती, शृंगार आणि वात्सल्य या रसाचा आविष्कार करण्यात त्यांची प्रतिभा अधिक रमते.त्याचबरोबर विनोदातही त्यांची प्रतिभा अधिक समरस होते. त्यामुळे त्यांची कविता भावनोत्कट झाली आहे. ती एकसुरी झालेली नाही. विशेषत: भक्ती, शृंगार, विनोद आणि वात्सल्य या भावनांचे चित्रण करताना त्यांची प्रतिभा आपला विलास दाखविते. त्यामुळे या भावनांचा आविष्कार करणाऱ्या त्यांच्या कविता मराठी साहित्यात स्थान मिळवतील. अशा उत्कट प्रकारच्या आहेत. त्या दृष्टीने 'सावळ्या विठ्ठला', 'देवा बोला हो माझ्याशी', 'माझा संभ्रम मिटेल का?''कोंबडा' 'आज भोंगा वाजत आहे' 'हरिणी आणि पाडस, 'लेकीची लावणी' 'आज पुनवेची रात' 'पावना मी खेड्यामधला' 'माझा गुरू' 'मुंबईची चाळ' या कविता अर्थपूर्ण वाटतात. या कविता वाचल्या की रा. ना. पवार यांची प्रतिभा अभिजात कशी होती याचा प्रत्यय येतो. एवढेच नव्हेतर डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी म्हटल्याप्रमाणे,.....भाव-भावनांचे भिन्न भिन्न रंग व्यक्त करणारी ही अेका

सहृदय कवीची कविता रसिकाना आनंद देईल.''[३]

**कल्पनाविलास :**

`काव्याच्या सौंदर्याचा एक महत्वाचा घटक म्हणजे कवीने आपल्या कवितेतून केलेला कल्पनाविलास होय. कवितेतून जो विचार किंवा भावना व्यक्त करावयाची ती प्रत्यक्ष व्यक्त न करता कल्पनाविलासाने व्यक्त केली जाते. 'भारतीय साहित्यकारानी 'ध्वनी आत्मा काव्यम्' अशी केलेली व्याख्या त्याच अर्थाने आहे. रा.ना. पवारांच्या कवितेत आपणास कल्पनाविलासाचा सुंदर आविष्कार झालेला दिसून येतो. पण त्यांची कविता साधी, सोपी व प्रासादिक असल्याने ते कल्पनाविलासाला नटविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत नाहीत. त्यांच्या अनुभवातून एखाद्या कल्पनेचा सहज आविष्कार होतो असे अनेक सौंदर्य स्थळे त्यांच्या काव्यात आढळतात.

**सगुण-निर्गुणरुप :**

परमेश्वर कधी सगुण रुपात दिसतो तर कधी निर्गुणरूपात दिसतो हे सांगताना त्यांनी फुलाचे सुंदर उदाहरण दिले आहे. 'रंग फुलांचा दिसे लोचना' असे परमेश्वराचे सगुणरूप असते तर काही वेळेला त्याचे रुप निर्गुण असूनही त्याचे अस्तित्व जाणवत असते म्हणून ते म्हणतात-

''दिसे कधी का कुणास सांगा
गंध फुलांचा मोहकसा'' (सावळ्या विठ्ठला, पृ.२)

'गंध' शब्दातून परमेश्वराचे निर्गुणरुप दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न अर्थपूर्ण आहे. सर्वात सुंदर कल्पनाविलास 'हे वंदे मातरम् गीता' या कवितेत आढळतो. पारतंत्र्याच्या तिरस्कारातून निर्माण झालेल्या या गीताने ब्रिटीश सत्तेला प्रचंड आव्हान दिले. या ऐतिहासिक घटनेचा **'फुल व काटा'** या शब्दांतून त्यांनी अत्यंत अर्थपूर्ण आविष्कार केला आहे. या गीताचा गौरव करताना त्यांनी म्हटले आहे-

''गुलामगिरीच्या काट्यामधुनी तू फुललास फुला
सत्तांधाना काटा होऊन तू खुपलास फुला'' (सावळ्या विठ्ठला,पृ.४४)

हे गीत काट्यातून फुललेले फुल असले तरी सत्तांधासाठी मात्र तो काटा होते, असे म्हणण्यात फार मोठी कल्पकता वाटते आहे.

**सूचक नाट्यमयता :**

काही वेळेला सूचक वर्णन करुन ते आपल्या काव्यात नाट्यमयता निर्माण करतात. या सूचक नाट्यमयतेमुळे मूळचा आशय अधिकच भावमधूर होतो. उदा. 'लेकीची लावणी' (पृ.५०) या कवितेत लेकीच्या पोटी लेक जन्माला येणार आहे. या सुखद जाणिवेने आनंदीत झालेला बाप म्हणतो-

''व्हटात बोलतंय, एकलच हसतय सुखात नांदतय
समजायचं तुमचं लेकरु हो
गोडकडू लागतय, आंबाट मागतय ढवाळ लागलंय
समजायचं तुमच्या मैनेला हो
चंद्राचा मुखडा काळजाचा तुकडा
वटीत खेळवा नातीला
आजा नातीला धरतोय छातीला'' (सावळ्या विठ्ठला, पृ.५१)

या ओळीतून वात्सल्यभावनेचा झालेला आविष्कार कमालीचा सूचक आहे. असा सूचक आविष्कार 'आज पुनवेची रात'(पृ.५८) या कवितेत शृंगार भावनेचे चित्रण केले आहे. समुद्र, तुफान व तारू या प्रतिमातून कवीने शृंगार भावनेचे चित्रण केले आहे. उन्मादक शृंगाराचे चित्रण असूनही येथे उत्ताणता आढळत नाही, याचे कारण कवीची कल्पनाशक्ती होय. या कवितेतील प्रेयसी आपल्या प्रियकराला म्हणते-

''सुरू लाटांचा धिंगा
दोघे घालू ये पिंगा
चल चल सारंगा
जरी उलटलं तारू समिंदरात
माझ्या जिवाचं तारुं तुझ्या हातांत
अर तांडेला वल्हव भरारा थांबू नको!'' (सावळ्या विठ्ठला, पृ.५८)

**विरोधी-नाट्यमय चित्रण :**

काही वेळेला कवी परस्परविरोधी चित्रण करुन नाट्यमयता निर्माण करतो. विरोधीनाट्य निर्माण करणे हे त्यांच्या कल्पनाविलासाचे एक वैशिष्ट्य होय.'माझा संभ्रम मिटेल का?', 'प्राक्तन', 'मुलगी दाखववावी म्हणतो' या कवितामध्ये या विरोध-नाट्यांचा सुंदर आविष्कार झालेला दिसून

येतो. 'माझा संभ्रम मिटेल का?' या कवितेत आजच्या स्वार्थी पुढाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यपूर्वकाळातील त्यागी पुढाऱ्यांचे त्यांनी केलेले वर्णन या विरोध-नाट्य शैलीमुळे कमालीचे अर्थपूर्ण झाले आहे. तसेच 'प्राक्तन' कवितेत श्रीमंताचे वैभव आणि गरिबांचे दारिद्र्य यांचेही विरोधी-नाट्यांने त्यांनी केलेले चित्रण कलात्मक वाटते. उदा.-

''झोपडीत बाळ रडे अंगाई कुणी गाईना
श्रीमंताच्या मोटारीत रेडिओच्या येती ताना'' (सावळ्या विठ्ठला, पृ.३४)

...

''जेवता कुणा येईना दोन्ही हात त्याचे थोटे
जेवताना कोणाकोणा पाहिजेत चमचे काटे'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ३४)

...

''फाटलेल्या वस्त्रातून कुणी लपवीते अंग
झिरझिरत्या वस्त्रातून कोण दाखविते अंग
औषधावाचून कोठे दगावती पोरे बाळे
अन्नपचावया कोणा औषध हवे चांगले'' (सावळ्या विठ्ठला, ३४)

'मुलगी दाखववावी म्हणतो' या ही कवितेत विरोध-नाट्य तत्वाच्या आधारे चित्रण केले आहे. आधुनिक 'फॅशनेबल' मुलगी आणि साधी 'शालीन' मुलगी या दोहोंचे त्यांनी चित्रण केले आहे. कृत्रिम साजशृंगारापेक्षा शालीन शृंगार सुंदर असतो. हे मुलगी व कविता या दोहोंच्या बाबतीत खरे आहे असा विचार त्यांनी मांडला आहे-

**रुपकता :**

काही वेळेला कवी रुपकातून विचार व भावना व्यक्त करतो. 'माणसा तू नष्ट होशील', 'कोंबडा', 'मी हिमालयाचा कडा', 'हरिणी आणि पाडस', 'मुलगी दाखववावी म्हणतो' या कवितेतून कवीने अर्थपूर्ण रुपकातून आपले विचार व भावना व्यक्त केल्या आहेत. 'माणसा तू नष्ट होशील' या कवितेत आजच्या विज्ञानयुगातील मानवाने निसर्ग उध्वस्त करुन पर्यावरणाचा प्रश्न बिकट केला आहे. हे वृक्ष आणि गंगा नदी यांच्या रुपकातून चित्रीत केले आहे. ही सर्वच कविता पर्यावरणावरील एक सुंदर रुपक आहे.'कोंबडा' या कवितेतून 'मृत्यु समीर दिसला म्हणून कर्तव्याला विसरु नको?' (पृ.२७) हा संदेश कोंबडा कसा देतो हे साध्याच परंतु अर्थपूर्ण रुपकातून माणसाला माणूस होण्याबद्दल

संदेश देतो; परंतु या कवितेतील अभिव्यक्ती कलात्मक वाटत नाही ही कविता प्रचारकी थाटाची वाटते मात्र 'हरिणी आणि पाडस' या कवितेद्वारे त्यांनी वात्सल्याचे जे चित्रण केले आहे ते अर्थपूर्ण आहे. मानवी जीवनातील भावनेचाच एका दृष्टीने आविष्कार आहे.

रा. ना. पवारांच्या कवितेतील कल्पनाविलासाचे हे स्वरुप पाहिले की असे दिसून येते,आपल्या अनुभवाला ते सरळपणे अभिव्यक्त करतात. तो अनुभव सुंदर आणि कलात्मक व्हावा असा प्रयत्न ते करीत नाहीत. त्यामुळे बऱ्याचशा कविता या निवेदनात्मक, वर्णनात्मक व काही वेळेला प्रचारात्मक बनली आहे, परंतु वर उल्लेखलेल्या कविता पाहिल्या की यांची साक्ष पटते की या कवीजवळ उत्कट कल्पनाशक्ती आहे; परंतु त्यांचा जसा वापर करावा तसा त्यांनी केला नाही. आपल्या अनुभवाला कल्पनाशक्तीच्या आधारे त्यांनी कलात्मकरुप दिले असते तर त्यांची कविता अधिक सुंदर व अर्थपूर्ण बनली असती.

**रा. ना. पवारांच्या कवितेतील भाषासौंदर्य :**

रा. ना. पवार यांनी आपल्या कवितेत साध्या, सोप्या व सरळ भाषाशैलीचा वापर केला आहे. प्रासादिकता हा कवितेचा गुणधर्म त्यांच्या कवितेत दिसतो. त्यांच्या बहुतांश कविता या प्रासादिक शैलीतच लिहिल्या गेल्या आहेत. उदा-

''सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले
विसरुन गेले देहभान '' (सावळ्या विठ्ठला, पृ.१)

....

''करावया तव मंगल पूजा
देहदीप मी जाळिन माझा'' (सावळ्या विठ्ठला, पृ.३)

....

''हासरे जग आसवांनी पाहणे नाही बरे
सौख्यदायी वेदनेला टाळणे नाही बरे'' (सावळ्या विठ्ठला, पृ.७)

''झोपडीत बाळ रडे अंगाई कुणी गाईना
श्रीमंतांच्या मोटारीत रेडिओच्या येती ताना'' (सावळ्या विठ्ठला, पृ.३४)

आपले विचार किंवा भावना ते सरळ साध्या व सोप्या भाषेत व्यक्त करतात. त्यामुळे सामान्य

वाचकांना त्यांच्या कवितेचे चटकन आकलन होते. आपली कविता शब्दविलासाने, कल्पनाविलासाने, प्रतिकाने सजवावी असे त्यांना वाटत नाही. त्यामुळे त्यांची कवितेतील साधी, सोपी भाषा रसिकांच्या मनाचा वेध घेते.

याचा अर्थ त्यांची कविता बालबोध आहे किंवा साधी आहे असा नाही, कारण त्या अभिव्यक्तिला कल्पनाविलासाची जोड आहे. योग्य त्या ठिकाणी आपला विचार किंवा भावना व्यक्त करताना त्यांनी योग्य समर्थक शब्द वापरले आहेत. उदा.-

''कृपाकटाक्षाचे पाजवी अमृत
ठेव शिरी हात पांडुरंगा'' (सावळ्या विठ्ठला, पृ.१)

परमेश्वराचे स्वरूप सांगताना त्यांने फुलाचे घेतलेले उदाहरण 'नका विचारु देव कसा' या कवितेत आले आहे ते अर्थपूर्ण वाटते. 'फुलांचा रंग म्हणजे परमेश्वराचे सगुण रुप' तर फुलांचा गंध म्हणजे त्याचे निर्गुणरुप ही कल्पना अत्यंत अर्थपूर्ण आहे. 'जीवनाचे शिल्प', 'हरिणी आणि पाडस', 'लेकीची लावणी', 'निळ्या नभी या', 'ते हास्य आज मावळले', 'नजर' या कवितांतून असे दिसून येते की या कवीजवळ शब्दभांडार अफाट आहे पण तो त्यांची उधळण करू इच्छित नाही. योग्य त्या शब्दांचाच समर्पक उपयोग करतात.

**संमिश्र शब्दशैली :**

रा. ना. पवारांच्या कवितांमध्ये जे शब्दप्रयोग वापरले ते पाहता असे दिसून येते की, त्यांची भाषाशैली 'संमिश्र' आहे. अनेक कवितांतून त्यांनी संस्कृत शब्दांचा वापर केला आहे. 'तू आवर अश्रूंची धार', 'लोकमान्य टिळक स्मरण', 'क्षणभर उघड नयन देवा', 'मानहानी', 'मानवी देहाचा वारस', 'हे वंदे मातरम् गीता', 'स्वर्ग सुखाचे दोनच क्षण', 'सोबत जन्माची' या कवितातून त्यांनी संस्कृत शब्दांचा फार वापर केला आहे. उदा-

''दास्य-पंकि रुतली माय, पाहुनी तिला
वेचिलेस तन-मन-धन काढण्या तिला
कारागृहिं वास तुझा होय नरवरा'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७८)

...

''विहरे सुधांशु निळ्या मंदिरात
मनो मंदिरात तूंच माझ्या

निळ्या या कासारी कमळांच्या ज्योती
तेजे तळपती नेत्र तुझे''                    (सावळ्या विठ्ठला, पृ.७१)

...

''तव हृदयातील मृदु संवेदन
देईल शब्दांना संजीवन
अश्रुंनी कां जनहृदयांवर
करिसी तडित-प्रहार!''                    (सावळ्या विठ्ठला, पृ. ८०)

ज्या कवितांतून त्यांनी संस्कृत शब्दांचा अधिक वापर केला आहे. त्यात काहीशी कृत्रिमता जाणवते. संस्कृत शब्दांचा वापर ज्या भक्तिगीतांतून योग्य ठरला असता त्या भक्तिगीतांमध्ये मात्र त्यांनी संस्कृत शब्दांचा फारसा उपयोग केला नाही. त्या गीतांमध्ये त्यांनी अस्सल मराठी शब्दांचा अधिक उपयोग केला आहे. तरीही ती गीते भावनिकदृष्ट्या अधिक उत्कट उतरली आहेत. म्हणून प्रश्न असा पडतो की, त्यांना संस्कृत शब्दांचा मोह का व्हावा? त्यांची प्रतिभा ही संस्कृत प्रचुर भाषेपेक्षा मराठमोळी भाषेत अधिक रमणारी आहे. ज्या कवितामध्ये त्यांनी मराठमोळी भाषेचा उपयोग केला त्याच त्यांच्या गाजलेल्या कविता आहेत. संस्कृत शब्दांचा मोह टाळला असता तर बरे झाले असते.

मराठमोळी भाषाशैली हे रा. ना. पवारांच्या कवितेचे खरे वैशिष्ट्ये होय. त्या दृष्टीने 'खंत', 'तोवर क्रांती अटळ आहे', 'माझा संभ्रम मिटेल का?', 'कोंबडा', 'आज भोंगा वाजत आहे', 'दुदुंभी रणाची आज भारती वाजे', 'लेकीची लावणी','रुप तुझं डोळयांत', 'आज पुनवेची रात', 'मी आले आंघोळीला', 'पावना मी खेड्यामधला', 'आज नाहीच कां बोलायचं?', 'मुंबईची चाळ' या कविता लक्षणीय वाटतात. या कवितांमध्ये अस्सल मराठमोळी भाषाशैली आढळते.

आपल्या कवितेतील विचार आणि भावना उत्कट होण्यासाठी त्यांनी अनेक कवितांमध्ये वाक्प्रचार, म्हणी, यांचा उपयोग केला आहे.उदा.-

'दाटला उमाळा अंतरी माझ्या' (पृ.१) 'प्रजाजनाचा कौल मानिती तेच श्रेष्ठ राजे' (पृ.६) 'संस्कृतीचा ढोल पिटणे'(पृ.७),'सुमंगल चिन्हे निष्प्रभ झाली निमिषांतरी',(पृ.२८) 'खापरानी घरा आता खापराची कळा आली',(पृ.३०), 'दाटतो गळा मन द्रवे माझे',(पृ.४०) 'दुःख हाय सुखाच्या संगतीला',(पृ.५०) 'धनुष्याविना तीर मारुनी पारध तू करिशी',(पृ.५५), 'एकाही शिष्याला अंगठा न मागणारा तू द्रोणाचार्य'(पृ.७२) या वाक्प्रचाराबरोबर त्यांनी 'आजमिळाचे नाव', 'चौऱ्यांशीचा फेरा', 'बिनव्याजी गहाण','अजागळ मन', 'छाती फाटत नव्हती', 'हुतात्म्यांची खाण', 'पांढरे

कपडे काळे दात', 'ऊर दडपला' 'खापराची कळा', 'लाचार लाळ घोटे', 'काळयमाची पकड', 'कुंकुमतिलक दिले', 'शालीन', 'भिजऱ्या डोळ्यांनी', 'कपाळी कोरलं', 'वन वे ट्रॅफीक' अशा शब्दप्रयोगांचा केलेला उपयोग हे ही त्यांच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्य आहे.

**बोलीभाषाशैली :**

सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांनी लावण्या आणि पोवाडे यातून 'बोली'चा जो उपयोग केला आहे तो वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'कोंबडा', 'अखेरचे पत्र','लेकीची लावणी', 'सोनं झालंया स्वस्त', 'रुप तुझं डोळ्यांत', 'मी आले आंघोळीला', 'नका गडे गालांत हसू', 'सांग कुठे शिकलीस?', 'पावना मी खेड्यामधला', 'माझा गुरू', 'मुंबईची चाळ' आणि 'आज भोंगा वाजत आहे' या कवितांतील भाषाशैली अत्यंत अर्थपूर्ण व समर्पक वाटते.

'कोंबडा' (पृ.२५) या कवितेत त्यांनी संमिश्र भाषाशैलीचा अर्थपूर्ण उपयोग केला आहे. रेल्वेमध्ये काम करणाऱ्या लोकांची इंग्लिश भाषा वैशिष्ट्यपूर्ण असते पण ते त्यांनाच कळते. उदा-

''टेनअप नाईन डाऊन ट्वेल्व्ह अप इलेव्हन डाऊन
मदर केम फोर्टीन अप फादर वेंट थर्टीन डाऊन
व्हॉट मॅन व्हेअर गुईंग? टेल कुलाली व्हेन कमींग?
ब्लडी सिस्टर बॉबे गॉन. डॅडी ब्रदर कुलाली गॉन'(सावळ्या विठ्ठला, पृ. २५/२६)

त्यांच्या कवितेत त्यांनी ग्रामीण भाषेचा केलेला उपयोग आशय आणि भाषाशैली या दोन्हो दृष्टीने अर्थपूर्ण आहे. स्टेशनवरच्या गमती-जमतीचे वर्णन करताना ते म्हणतात-

''तोच कुणीतरी पावना आला फलाटावरुन बोलता झाला
'साहेब थोडं ऐकताव का? गाडी थांबवून धरताव कां?
सामान समदं उतरुन झालं, परंतु साहेब विपरीत झालं
एकदोन लेकरं सापडत नाहीत बायको अन् मेव्हणी दिसतच नाहीत
तोच लांबून आली हाक, 'कारभारी आम्ही हिकडं हाव
समदीं लेकरं बरोबर हायती तुमचीच आम्हाला धास्ती होती
त्याची त्याला चूक कळली, गार्ड हसला, गाडी ढळली''(सावळ्या विठ्ठला,पृ.२६)

रेल्वेप्लॅटफॉर्मवरील दृश्याचे वर्णन करताना वेगवेगळ्या भाषाशैलीचा वापर केला आहे. गिरणी बंद पडल्यानंतर एका गिरणी मजूराच्या कुटुंबियाची वाताहतीचे वर्णन करताना त्यांनी बोलीचा चांगला

उपयोग केला आहे-

> ''घरातील भांडी सारी मोडीसाठी उजवीली
> खापरानी धरा आता खापराची कळा आली''(सा. विठ्ठला, पृ. ३०)

परंतु बोलीभाषेचा सर्वात सुंदर आविष्कार झाला आहे, तो 'लेकीची लावणी' (पृ.५०) या कवितेत. अस्सल मराठमोळ्या भाषेत एका लेकीच्या बापाच्या मनातील भावना व्यक्त केली आहे. या संपूर्ण कवितेत ग्रामीण जीवनातील बोलीचा अत्यंत समर्पक असा उपयोग केला आहे. या कवितेत केवळ बोलीभाषा आहे किंवा ग्रामीण भाषा आहे म्हणून या कवितेचे महत्व नसून त्या भाषेतून ग्रामीण माणसाच्या मनातील भावना व्यक्त झाल्या आहेत. रा. ना. पवारांच्या काव्यसंग्रहातील ही अशी एक सुंदर कविता आहे की, ज्यामध्ये आशय व आविष्कार, भावना व भाषा याचा सुंदर मिलाप झाला आहे. या कवितेत भावनेमुळे भाषेला सौंदर्य आले की भाषेमुळे भावनेला सौंदर्य आले. असा प्रश्न मनात उभा राहतो. या कवितेतील बाप 'ग्रामीण' आहे, त्यांचे मन 'ग्रामीण' आहे, प्रसंग 'ग्रामीण' आहे आणि भाषाशैलीही 'ग्रामीण' आहे या सर्वांच्या मिश्रणातून या कवितेचे रसायन तयार झाले आहे. त्यादृष्टीने खालील ओळी अर्थपूर्ण वाटतात-

> ''पोटी आली पोर बापा लागे घोर होईल उद्या थोर
> चिमणी ही माझी चिमणी ही'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५०)
> ...
> ''पल्याड गावनं आल्यात पावनं, पोरीला दावनं
> झालंय हो रामपाराला'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५०)
> ...
> ''गोडकडू लागतय आंबाट मागतय ढवाळ लागलय
> समजायचं तुमच्या मैनेला हो
> चंद्राचा मुखडा काळजाचा तुकडा
> वटीत खेळवा नातीला
> आजा नातीला धरतोय छातीला'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५१)

या कवितेत ग्रामीण भाषेतून वात्सल्यभावनेचा सुंदर आविष्कार झाला आहे. तसा काही कवितांमधून ग्रामीण परिसरात राहाणाऱ्या माणसाचा 'रागडा' शृंगार ग्रामीण बोलीतून रा. ना. पवारांनी अभिव्यक्त केला आहे. उदा-

''वाऱ्याने उडतो रे माझा पदर
पांहू नको तूं रोखून नजर
धटिंगणा काय म्हणूं आतां तुला?
जीव माझा घाबरला, सांगु इथं कोणाला?
सोड मला दया कशी नाही तुला? ''    (सावळ्या विठ्ठला, पृष्ट ५४)

दुसऱ्या एका कवितेतील शृंगारिक भावना बोली भाषेतून व्यक्त केल्यामूळे उत्कट झाली आहे. त्या कवितेतील नायिका म्हणते-

''सुरूं लाटांचा धिंगा
दोघे घालू ये पिंगा
चल चल सारंगा
जरी उलटलं तारू तुझ्या हातांत
माझ्या जिवाचं तारूं तुझ्या हातांत
अर तांडेला वल्हव भरारा थांबू नको!
नाव समिंदरांत माझी लोटू नको!''    (सावळ्या विठ्ठला, पृ. ५८)

ग्रामीण मन, भावना व भाषा या सर्वाच्या मिलापातून 'पावना मी खेड्यामधला '(पृष्ठ ६२) या कवितेतील अनुभव अत्यंत प्रत्ययकारी बनला आहे. 'लेकीच्या लावणी ' प्रमाणे हे ही संपूर्ण कविता बोलीभाषा व भावना व्यक्त करते. अस्सल सोलापुरी भाषेचा ठसा या कवितेवरती उमटलेला आहे. या कवितेतील खेड्यातील पाव्हण्याला मुंबईत आलेला अद्भूत अनुभव अत्यंत समर्पक शब्दांत रेखाटला आहे. उदा-

''रूळावरी आगीनगाड्या रस्त्यावरती टरामगाड्या
मायंदळ गाड्या पम्पम् गाड्या जिकडं तिकडं गाड्याच गाड्या
रस्त्यावरनं चालताना पावना घाबरला ''(सावळ्या विठ्ठला, पृष्ठ ६२)

'माझा गुरू'(पृष्ठ ६३) या कवितेत बोलीचा उत्कट आविष्कार झाला आहे. एका भिकाऱ्याच्या तोंडचे उद्गार पाहण्यासारखे आहेत तो म्हणतो-

''माझा बाप रांड घिवून पळून गेला
अन् माझ्या आईला कालच ल्योक झाला''(सावळ्या विठ्ठला, पृष्ठ ६४)

या सर्व कविता पाहिल्या की रा.ना. पवार हे बोली भाषेचा कसा अर्थपूर्ण उपयोग करतात हे दिसून येते. त्यांची भाषाशैली आशयानुरूप वेगवेगळे रूप धारण करू शकते. मध्यमवर्गियांच्या भावना व्यक्त करताना त्यांची भाषा प्रमाणभाषेचा आधार घेते. तर झोपडपट्टीतील, गिरणीतील,ग्रामीण भागातील व्यक्तिच्या भावना व्यक्त करताना बोलीभाषेचा आधार घेते. विशेष म्हणजे बोलीचा आधार घेऊन लिहिलेल्या 'कोबंडा', 'आज भोंगा वाजत आहे', 'मुंबईची चाळ','पावना मी खेड्यामधला ' या कविता आशय आणि अभिव्यक्तिच्या बाबतीत सुंदर व प्रत्ययकारी वाटतात.

एकंदरीत रा.ना. पवारांनी आपल्या कवितेत संमिश्र भाषाशैली वापरली आहे. संस्कृत, मराठी, इंग्रजी, ग्रामीण बोली अशा विविध भाषांचा उपयोग केला आहे. भाषेच्या दृष्टीकोनातून विचार करता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की ज्या कवितांमध्ये त्यांनी ग्रामीण बोलीचा उपयोग केला आहे. त्या कविता आशय व अभिव्यक्ती या दृष्टीने उत्कट उतरल्या आहेत. 'लेकीची लावणी', 'पावना मी खेड्यामधला' या सारख्या कविता पाहिल्या की, असे म्हणण्याचा प्रत्यय येतो. याच भाषेचा उपयोग करून त्यांनी इतर कविता लिहिल्या असत्या तर ग्रामीण साहित्यात त्यांना निश्चितपणे स्थान मिळाले असते.

**शब्दविलास :**

भाषाशैलीच्या दृष्टीने विचार करताना त्यांची 'नजर' (पृष्ठ ८५) ही कविता अर्थपूर्ण वाटते. शालेय जीवनापासूनच त्यांना शब्दांशी खेळण्याचा छंद होता. शब्दकोश, उत्पत्तिकोश वाचले होते. हे चरित्राच्या प्रकरणात स्पष्ट केले आहे. या शब्द छंदातून निर्माण झालेली. कविता त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. या कवितेत विचार किंवा भावना प्रभावी नाही पण 'नजर' या एका शब्दांच्या आधारे विविध पातळीवरुन जो आविष्कार केला आहे, तो पाहण्यासारखा आहे. त्या दृष्टीने खालील ओळी पाहण्यासारख्या आहेत उदा:

> ''हृदयातलं सार नजरेत उतरायचं
> दुनिया नजर ओळखीत नाही त्याला काय करायचं'' (सा. वि., पृष्ठ ८५)

या कवितेत पापी नजर, नजरेत भरणे, नजरेचा धाक, नजरेचा नजराणा, नजरेचा बाधा, नजरेचा धोका, नजर मरणे, नजरेचे पारणे फिटणे, नजरेची नजाकत, नजर काढणे, नजरेचा गजर अशा विविध शब्दांचा त्यांनी केलेला उपयोग त्यांचे शब्द सामर्थ्य दाखविते. उदा:-

> ''एखाद्या नजरेने दगड सुध्दा फुटतो

आणि एखाद्या नजरेने माणूस माणसांतून उठतो
डोळयांतले काजळ नजरेत भरते
नजरच जिथे मेलेली तिथं रंभासुध्दा रडते '' (सावळया विठ्ठला, पृष्ठ ८६)
...
''नजरेचा अभिनय नर्तकी जाणते
विश्वामित्राला सुध्दा नाचायला लावते '' (सावळया विठ्ठला, पृष्ठ ८६)

**काव्यरचनेतील प्रयोगशीलता:**

रा.ना.पवारांच्या 'सावळ्या विठ्ठला ' व 'संग्रामगीते' या संग्रहातील कविता पाहिल्या तर असे दिसून येते की, काव्यरचनेच्या बाबतीत त्यांनी विविध प्रयोग केले आहेत. एका ठराविक रचना प्रकारात त्यांनी कविता लिहिलेल्या नाहीत. 'सावळया विठ्ठला ', 'नका विचारु देव कसा' या कविता अभंग रचनेतून लिहिल्या आहेत. क्षणभर उघड नयन देवा ', देवा बोला हो माझ्याशी', 'भेटतील श्रीराम' यांची रचना भावगीतांतून केली आहे. 'चल ये रे श्रीरंगा' यासारखी गौळण त्यांनी रचली आहे. 'लेकीची लावणी' ही त्यांची कविता पाहिली की, कवी संजीव यांनी म्हटले आहे त्याचा प्रत्यय येतो. ते म्हणतात, ''लावण्या शृंगारिक असतात किंवा असाव्यात हा संकेत मोडून वात्सल्याने ओथंबलेली लावणी लेकीच्या बापाला सूचल्यास नवल नाही. ही लावणी जितकी सुबक तितकीच शब्दरचनेच्या दृष्टीने लाटानुप्रासावर चाळ बांधून नाचत जाते. तरी ती जिव्हाळयाचा आशय सोडत नाही''.[४] शृंगार रसाएवढाच वात्सल्यरसही लावणीतून उत्कटत्तेने व्यक्त करता येतो. हे रा.ना. पवारांनी सिध्द केले आहे. 'दुदुंभी रणाची आज भारती वाजे ', 'अंतिम जय अपुल्या हाती', 'मराठी गड्यांनो', 'आव्हान तुझे यशवंत', या सारख्या राष्ट्रीय गीतांची योजना पोवाड्याच्या, संग्रामगीतांच्या, स्फुर्तिगीतांच्या धर्तीवर केली आहे. विशेषत: 'मायभूमीची सेवा करु दे थोडी', 'दुष्ट शब्द तो नको चिनी', 'चिनी माऊचा बोका', या राष्ट्रीय बालगीतांची रचना केली आहे हे वैशिष्टयपूर्ण वाटते.

'लेकीची लावणी', 'जात्यावरचे गाणे' या गीतांचा बाज प्राचीन लोकगीतासारखा आहे. तर 'खंत,' 'माणसा तू नष्ट होशील,' 'माझा संभ्रम मिटेल का?,' 'कोंबडा,' 'मुलगी दाखववावी म्हणतो' या कविता आधुनिक मुक्तछंदात आहेत. तसेच 'जीवनाचे शिल्प,' 'मानहानी,' 'देव,' 'जीवनाचे व्दैत' या कविता गझल वृत्तात आहेत.

रा.ना.पवारांचे विविध काव्य रचना प्रकार पाहिले की असे दिसून येते की, 'अभंग,' 'ओवी', 'गौळण', 'लावणी', 'पोवाडे' यासारखे प्राचीन काव्यप्रकारातून कविता लिहिणे त्यांना आवडते.

त्यामुळे त्या कविता रसमयदृष्ट्या चांगल्या झाल्या आहेत. त्याचबरोबर 'गझल', 'संग्रामगीते', 'नाट्यगीते', 'मुक्तछंद', 'गौरवगीते' असे आधुनिक काव्यप्रकारांतही त्यांनी कविता लिहिल्या आहेत त्यांच्या काव्यप्रकारात विविध प्रकारची काव्य प्रकारता आढळते.

**संबोधनात्मकता व वक्तृव :**

रा.ना.पवारांच्या बऱ्याचशा कविता या वर्णनपर असण्यापेक्षा संवादात्मक आहेत. कुणाला तरी संबोधून वक्तृत्वाचा शैलीत ते अभिव्यक्त करतात. उदा :-

''सावळया विठ्ठला तुझ्या दारी आले
विसरुन गेले देहभान '' (सावळ्या विठ्ठला, पृष्ठ १)

...

''देवा बोला हो माझ्याशी
तुम्हीच मजवर रुसल्यावरती
बोलू मी कोणाशी '' (सावळ्या विठ्ठला, पृष्ठ ४)

...

''वर्तमानपत्रं वाचता तुम्ही ?
काय म्हणता मी?
अहो म्हणून तर विचारतोय मी
राजकारण, समाजकारण
अर्थकारण, धर्मकारण
वाचून शिणूं नका विनाकारण'' (सावळ्या विठ्ठला, पृष्ठ १४)

...

''पत्र हे प्रिये तुला लिहावयास घेतले
अखेरचेच पत्र हे ठरेल काय प्रेमले '' (सावळ्या विठ्ठला, पृष्ठ ४१)

...

''सीमेवरच्या बहादूरांनो तुम्हांस कोटी प्रणाम
आमुचे तुम्हांस कोटी प्रणाम'' (सावळ्या विठ्ठला, पृष्ठ ४२)

...

''चल ये रे श्रीरंगा मुकुंदा वृंदावनी ये रे''
मी उभी तुझ्या वाटेला दोन्ही डोळे लावुनि रे ! ''(सावळया विठ्ठला पृष्ठ ५७)

या संवादात्मक व संबोधनात्मक रचनेमुळे कवितेत उत्कटता निर्माण झालेली आहे. आधुनिक काव्यापेक्षा प्राचीन काव्यप्रकारांत मात्र ते अधिक रमतात म्हणून डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी म्हंटले आहे, ''अेका अर्थानं नवकवितेपेक्षा रा.ना. हे जुन्या कवितेचे भोक्ते होते असं म्हणता येअील. या संग्रहातल्या बहुतांश कविता छंदोबध्द आहेत. वृत्तांतून बांधलेली कविता त्यांना विशेष प्रिय होती. मराठीतल्या प्राचीन कवितेचं त्यांनी मन:पूर्वक अध्ययन केलं होतं. शाहिरी कवितेचाही त्यांच्या मन:पिंडावर खोल संस्कार झाला होता हे जाणवत राहातं. आधुनिक मराठी कवितेचा त्यांनी अभ्यास केला असला तरी मनानं ते शाहीर कवीच्या काव्याशी विशेष समरस झाले असावेत. पुढे गीतलेखनाकडं वळल्यावर त्यांची कविता भावगीताच्या चाकोरीतून चालू लागली. आपल्या काव्यरचनेत वेगवेगळे प्रयोग करावते असं त्यांना वाटलं तरी त्या दृष्टीनं त्यांनी फारसे प्रयत्न केले नाहीत. रचनेच्या वैशिष्ट्यांपेक्षा भाव आणि कल्पना व चिंतनशीलता यात त्यांच्या कवितेचं सामर्थ्य सामावलेलं आहे असं म्हणता येअील.''[५] तसेच कवी संजीव म्हणतात, ''रा.ना. च्या कवितेच्या संदर्भात सांगायचे तर सांकेतिकता व पारंपारिकेताच्या वाटेवर ते निघाले आहेत पण यातही त्यांनी आपला ठसा कायम ठेवला आहे. कवितेच्या कारुण्याला विनोदाची झालर लावीत लावीत नाटयमय प्रसंगाने कवितेला ते एकदमच नाटयमय कलाटणी देतात.'' [६]

रा.ना. पवारांच्या कवितेत विविध अनुभवाचा उत्कट आविष्कार झाला आहे आणि त्यांच्या विशिष्ट भाषाशैलीमुळे, प्रयोगशीलतेमुळे, शब्दसामर्थ्यामुळे त्यांच्या अनुभवाची अभिव्यक्ती देखील आकर्षक बनली आहे.

**गेयपूर्ण कविता :**

रा.ना. पवारांना लहानपणापासूनच भजन, कीर्तन ऐकायची आवड होती. 'नक्कल करणे' हा त्यांच्या जीवनाचा लहानपणी अविभाज्य अंग होता. त्यामुळे त्यांच्या मनावर गेयतेचा परिणाम व आवड निर्माण होणे साहजिकच होते. संगीत हा त्यांचा आवडता विषय होता, त्यामुळे रा.ना. पवारांच्या कवितेला एक प्रकारची लयबध्दता प्राप्त झाली आहे. 'रस, नाद,लय,ताल यात गम्य आहे' म्हणून डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, ''आपली कविता मधुर स्वरात गाअून दाखविणारे अेक कवी म्हणून ते प्रसिध्दीला आले.''[७] त्यांनी मुक्तछंदातून कविता जरी लिहिल्या असल्या तरी त्या कवितेतील शब्दांना एक विशिष्ट प्रकारची लयबध्दता प्राप्त झाली आहे. म्हणून डॉ.निर्मलकुमार फडकुले यांनी म्हंटले आहे, '' गद्यप्राय वाटणाऱ्या त्यांच्या कवितांना अेक अंगभूत लय आहे. शब्दांना ताल, लय आणि तोल आहे.'' [८]

'सावळ्या विठ्ठला', 'नका विचारू देव कसा,' 'क्षणभर उघन नयन देवा,' 'देवा बोला हो माझ्याशी'' या भक्तिगीतांमध्ये अभंगवाणीचे सौंदर्य आहे. 'दुदुंभी रणाची आज भारती वाजे,' 'सीमेवरच्या बहादुरांनो,' 'अंतिम जय अपुल्या हाती', 'मराठे गड्यांनो' या पोवाड्यांमध्ये ही लयबद्धता जाणवते. 'लेकीची लावणी,' 'नका गडे गालात हसू' या लावण्यांमध्ये लयबद्धता जाणवते. या सर्व त्यांच्या गाजलेल्या कविता आहेत आणि त्या कवितांचे वाचन ते ढंगदारशैलीत सादर करीत असत. म्हणून कवी संजीव यांनी त्यांच्या गेयबद्ध कवितेबद्दल म्हटले आहे, ''भावगीतकार आणि कवी या दोन भिन्न प्रवृत्तीच्या रचना आहेत. उत्कृष्ट भावगीतकार कवी असू शकतो. पण श्रेष्ठ कवींना उत्कृष्ट भावगीते लिहिता येतीलच असे नाही...भावगीतकाराला स्वरांचे ज्ञान असणे आवश्यक असते. त्याला ताल आणि लयचं अंग असावं लागतं...भावगीत स्वर रचनेसाठी प्रत्येक गीताला स्वतंत्र मीटर वापरावे लागते आणि मीटर्स कवीलाच बांधावे लागतात. तसा कवितेत प्रकार नसतो. ठराविक छंद, वृत्त, जाती किंवा मुक्तछंद यांचाच वापर कवी सर्रास करतात, पण यापेक्षा वेगळी रचना भावगीतकाराला करावी लागते...कवी रा. ना. पवार ते स्वत: गायक आहेत. तेव्हा भावगीतांना आवश्यक असणारी त्यांची मुळातच बैठक आहे. त्यामुळेच कवी रा. ना. पवारांना एवढी चांगली गीत समर्थपणे हाताळता आली''[१] याचा अर्थ त्यांच्या बऱ्याचशा कविता तालबद्ध व लयबद्ध आहेत. त्यामुळे त्यांच्या कवितेला गेयता प्राप्त झाली आहे. 'माणिक वर्मा', 'ज्योत्स्ना भोळे', 'सुमन कल्याणपूर', 'हेमलता मांजरेकर', 'शांता शिराळ', 'जे. जी. गोरे', 'जी. जे. वाटवे,' 'दशरथ पुजारी' 'कृष्णा शिंदे', 'विठ्ठल शिंदे' यांनी त्यांच्या कवितांचे गायन केले. त्या गायनाच्या रेकॉर्डस् निघाल्या आणि त्यांची गीते गाजली. हे त्यांच्या काव्यातील गेयबद्धतेचे प्रतीक होय.

**रा. ना. पवारांच्या काव्यात प्रकट झालेले वाङ्मयीन व्यक्तित्व :**

रा. ना. पवारांची कविता ही केवळ कलावादी, सौंदर्यवादी नाही तर ती जीवनवादी आहे. जीवनातला आनंद उपभोगणारी आहे. 'जीवनाचे शिल्प' कोरणारी आहे. आपल्या वैयक्तिक जीवनातील सुख-दु:खाच्या आविष्कारात रममाण होण्याऐवजी, समाजाजीवनातील वास्तव जीवनातील सुख-दु:खाचा आविष्कार करावा, अशी त्यांची भूमिका आहे. जीवन जगत असताना सुख-दु:खाचे जे अनुभव आले. तसेच बाह्यजीवनात ज्या घटना घडल्या, त्याचा त्यांनी आपल्या काव्यातून आविष्कार केला आहे. त्यामुळे त्यांची कविता त्यांच्या जीवनानुभवांतून प्रकट झालेल्या व्यक्तित्वाशी संबंधित आहे. ह्या माणसासारखीच त्यांची कविताही आहे. त्यांच्या कवितेविषयी सांगताना डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी म्हटले आहे, '...या कवीच्या अंत:करणाशी सुखसंवाद करीत असलेली जन्माची प्रेयसी असलेली कविता त्यांना कधीच सोडून गेली नाही. कविराय रामजोशीच्या आयुष्यातील 'बया'

ही जशी रामजोशीची कविता होती, त्याचप्रमाणे 'राम' नाव असलेल्या या दुसऱ्या सोलापूरकर कलंदर रसिकाच्या आयुष्यात कवितेचे स्थान असेच अटळ व अतूट आहे. त्यांचा उपयोग समाजजीवनातील चित्रण करण्यासाठी व जीवनाचा आलेख रेखाटण्यासाठीच केला आहे.''[१०] लहानपणापासून त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी होत गेली, याचा परामर्श पहिल्या प्रकरणात घेतला आहे. या ठिकाणी त्यांच्या कवितांमधून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे कोणते गुण दिसून येतात, याचा विचार करावयाचा आहे.

**श्रद्धाशीलता :**

रा. ना. पवारांचे मन कमालीचे श्रद्धाशील आहे. त्यांना 'परमेश्वर', 'परमेश्वराचेच रूप असलेले आई-वडील', 'महापुरुष' यांच्याबद्दल त्यांच्या मनात कमालीचा आदरभाव आहे. त्यांचे घराणे देवळातील पुजारी असल्यामुळे त्यांच्यावर भजन, कीर्तन ऐकल्याचा बराच परिणाम झालेला आहे की, ते परमेश्वराचे अस्तित्व मान्य करतात. या त्यांच्या श्रद्धाशील भावनेतूनच त्यांनी लिहिलेली भक्तिगीते अंत:करणातून उफाळून वर आल्यामुळे सुंदर रेखाटलेली आहेत. त्यांच्या मधुर भक्तिगीतांमध्ये भावप्रगल्भता व अर्थप्रगल्भता व्यक्त झाली आहे. ती या श्रद्धाशीलतेमुळेच. त्यांच्या ठिकाणी आस्तिकबुद्धी असल्यामुळे त्यांना देवाचे अस्तित्व मान्य केले आहे. म्हणूनच ते म्हणतात-

''कोणी म्हणू नका हो दुनियेत देव नाही,
देवा समान दुसरी दुनियेत ठेव नाही'' (सावळ्या विठ्ठला, पृष्ठ ३६)

परंतु त्यांची भक्तिभावना ही आंधळी नाही तर डोळस आहे. त्या परमेश्वराचे स्वरूप त्यांना महापुरुषांमध्येही आढळले म्हणून 'ज्ञानेश्वर', 'रामदास', 'लोकमान्य टिळक', 'स्वामी दयानंद सरस्वती', 'पंडित नेहरू', 'आचार्य अत्रे' यांच्याविषयी त्यांनी गौरवगीते लिहिली आहेत. त्यांच्या शब्दांत सांगायचे तर -

''जे जे उज्ज्वल पवित्र मंगल शिर तिथे नमवूं
या मातीचा टिळा कपाळी श्रद्धेने मिरवूं'' (सावळ्या विठ्ठला, पृष्ठ ८७)

केवळ परमेश्वरावर आणि महापुरुषावर त्यांची श्रद्धा नाही तर मानवी जीवनातील उदात्त मूल्यांवरही त्यांची श्रद्धा आहे. त्या दृष्टीने 'माझा गुरू', (पृष्ठ ६३) 'यशोदा', (पृष्ठ ५६) 'सीमेवरच्या बहादुरांनो', (पृष्ठ ४२) 'कोंबडा', (पृष्ठ २५) 'माझा संभ्रम मिटेल का?' (पृष्ठ १९) या कविता अर्थपूर्ण वाटतात.

### कुटुंबप्रियता :

रा. ना. पवारांच्या अनेक कवितांतून कौटुंबिक जीवनाचे उत्कटतेने व सहृदयतेने केलेले चित्रण आढळून येते. 'आज भोंगा वाजत आहे' या कवितेतील आई, 'अखेरचे पत्र' मधील सैनिक असलेला पती, 'हरिणी आणि पाडस'मध्ये मायलेकीचे प्रेम, 'लेकीची लावणी'मधील पित्याचे मुलीवर असलेले प्रेम, 'सोनं झालंया स्वस्त'मधील पती-पत्नीचा संवाद, 'माझा गुरू'मधील आईवर जीवापाड प्रेम करणारा मुलगा, 'आज नाहीचं कां बोलायचं' या कवितेतील पती-पत्नी यांचा शृंगार, 'मुंबईची चाळ'मधील शहरातील मध्यमवर्गीयांचे किड्यामुंग्यासारखे जीवन जगणाऱ्या कुटुंबाचे चित्रण, 'भाऊबीज'मधील बंधुप्रेमाला पारखी झालेल्या बहिणींचे चित्रण, 'दूर वाटेवरी' या कवितेत स्त्रीच्या मनातील सासर व माहेरची ओढ, 'लक्ष्मणा डोळे पुस तुझे'मधील पातीव्रत्य असलेली सीता, अशा विविधतेचे चित्रण त्यांनी केले. आई, वडील, मुलगा, बहिण, भाऊ व पती-पत्नी यांचे भावसंबंध त्यांनी रेखाटले आहेत. अशी अनेक संसारिक चित्रे त्यांनी आपल्या कवितेतून उत्कटपणे टिपले आहेत. या सर्व कवितांतून कौटुंबिक जीवनावर त्यांचे किती प्रेम होते, याचा प्रत्यय येतो.

### सामाजिक व राजकीय जाणीव :

रा. ना. पवार हे केवळ आपल्याच सुख-दुःखात गुरफटून राहत नाहीत तर समाजातील दीन-दुबळ्यांच्या सुख-दुःखाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतात. त्यांचे जीवन जाणण्याचा प्रयत्न करतात. समाजातील होणाऱ्या अन्यायाविरुद्ध कवितेतून आग ओकतात. तसेच राजकारणातील ढोंगी पुढाऱ्यांवर प्रहार करतात. या त्यांच्या ठायी असलेल्या सामाजिक जाणिवेचा आणि राष्ट्रीय भावनेचा प्रत्यय त्यांच्या सामाजिक व राजकीय कवितांतून दिसून येतो. समाजाजीवनातील तळागाळातील लोकांचे दुःख व दारिद्र्य पाहून त्यांचे अंतःकरण विदीर्ण होते. समाजातील दुःख, दारिद्र्य व विषमतेचे चित्रण त्यांच्या कवितेतून केले आहेत. हे 'तोवर क्रांती अटळ आहे', 'आज भोंगा वाजत आहे', 'माझा गुरू' या कवितांतून दिसून येते. आजच्या यंत्रप्रधान व अर्थप्रधान संस्कृतीमुळे माणसाची मने किडकी बनत आहेत. मानवतावादाला ओहोटी लागलेली दिसून येते. माणूस माणसाला माणसातून ऊठवत आहे. वरचेवर मनुष्य स्वार्थी बनत चालला आहे, याची त्यांना खंत वाटते आणि चीडही येते. आजच्या या स्वार्थी व आत्मकेंद्रीत प्रवृत्तीने मानवतावादाप्रमाणे राष्ट्रीयतेचाही बळी घेतला आहे, हे पाहून या कवीचे मन पेटून उठते आणि त्यातूनच 'माझा संभ्रम मिटेल का?' यासारखी कविता निर्माण होते. 'तोवर क्रांती अटळ आहे' या कवितेत त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, 'भारतामधल्या पुंजीवादाने समाजवाद, साम्यवाद, राष्ट्रवाद व विश्ववाद यांना गिळून टाकले आहे. समाजजीवनातील व राजकारणातील

स्वार्थीवृत्ती, अन्याय, दु:ख, दारिद्र्य आणि विषमता याचे चित्रण करताना त्यांच्या लेखणीला एक प्रकारची धार चढते. अशावेळी स्पष्टपणाने ते ढोंगी लोकांवर पायातले हातात घेण्यासही धजत नाहीत व त्यांच्या प्रवृत्तीवर ते तुटून पडतात. समाजातील दु:ख, दारिद्र्य पाहून त्यांचे मन कारुण्याने कळवळून भरभरून येते, तर सामाजिक विसंगतीतून ढोंगीपणातून त्यांच्या मनात प्रक्षोभ निर्माण होतो. त्या अक्रंदातून 'तोवर क्रांती अटळ आहे' यासारख्या कवितेतून ज्वालामुखी भडकतो. म्हणून डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी म्हटले आहे, ''कै. रा. ना. पवार हे मनस्वीवृत्तीचे कवी होते. जे आपल्या अंत:करणप्रवृत्तीला पटतं त्याचा त्यांनी अुद्‌घोष केला आणि जे पटत नाही त्याचा त्यांनी तीव्र स्वरात धि:कारही केला. जीवनाकडं पाहण्याची त्यांची हीच दृष्टी होती. त्यांचं मन निकोप होतं. भावना अुत्कट होती, भाषा रगेल होती. या स्वभावाच्या कित्येक रंगच्छटा त्यांच्या कवितेतही अुमटाव्यात हे स्वाभाविक आहे. अेखाद्या करुणोदात्त अनुभवानं ते भावविवश होत असत. त्यांच्या डोळ्यात अशावेळी अश्रू उभे राहात. पण अेखाद्या सामाजिक विसंगतीनं, अन्यायानं ते प्रक्षुब्ध होअून अुठत असतं. त्यावेळी त्यांची कविता ज्वालाग्राही होत असे. अुत्कटतेवर आणि भव्यतेवर ते लुब्ध असायचे'' [११]कवी संजीवनेही त्यांचा निडर व कणखर व्यक्तिमत्वाविषयी म्हटले आहे-

''साकेंतिक परंपरा धुडकावण्यासाठी
अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी
रा. ना. पवार कुणाची भीडभाड ठेवणार नाहीत
त्यांच्या मनात अखंड जागतो
एक निस्पृह रामशास्त्री''[१२]

अशा निडर व निस्पृह व्यक्तिमत्वात राष्ट्रभक्तिची भावनाही आढळते. स्वातंत्र्यपूर्व काळातील आंदोलनाचा त्यांच्या मनावर परिणाम झालेला असल्याने राष्ट्रासाठी त्याग करणे हे मूल्य त्यांना महत्वाचे वाटते, म्हणून असा त्याग करणाऱ्या हुतात्म्यांचा, सैनिकांचा अनेक कवितांतून त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. मातृभूमी, राष्ट्रध्वज, राष्ट्रीय नेते, महापुरुष यांच्याविषयीचा अभिमान अनेक कवितांतून व्यक्त झाला आहे. भारत-चीन युद्धावर आधारित त्यांनी लिहिलेली 'संग्रामगीते' त्यांच्या ज्वलंत राष्ट्रभक्तीचा काव्यमय आविष्कार होय. चीनच्या आक्रमणामुळे या अन्यायी कृत्यामुळे ते पेटून उठलेले दिसतात, पण एक प्रश्न मनात असा उभा राहतो की, महाराष्ट्राबद्दल अभिमान बाळगणाऱ्या या कवीने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस उभा महाराष्ट्र पेटून उठला होता. त्यावेळी प्रत्येकाची लेखणी दाह ओकत होती, पण या कवीने त्यावेळेस एकही कविता लिहू नये? याचे विशेष वाटते.

**विनोदप्रियता :**

रा. ना. पवारांच्या ठायी एक विनोदी मनही आहे. लहानपणापासून नकला करीत असल्यानुळे ते नकलाकार म्हणून प्रसिद्धीला आले होते. त्यांच्याविषयी दिवाकर दुनारवे यांनी म्हटले आहे, ''हा निर्मळ मनाचा कवी समाजाच्या अंत:मनात शिरून तेथील स्वार्थी प्रवृत्ती, अंधश्रद्धा परस्पर विरोधी भावना व विचार यांची गल्लत इत्यादी गोष्टी इतक्या बारकाईने टिपील व त्या तितक्याच उपहासात्मक, उपरोधिक व खोचक बोचक शैलीत परखडपणे मांडील हे त्यांच्या कित्येक विनोदी कविता वाचूनही खरे वाटत नाही. त्यांच्या विनोदाचे दुसरे वैशिष्ठ्य म्हणजे त्याला असलेली कारुण्याची अदृश्य झालर! माणुसकीच्या कळवळ्यानेच त्यांनी विनोदातून करुणरस साकार केल्याचे दिसून येते. विनोद करून खळखळून हसविणारा अंतर्यामी रडत असतो असे म्हणतात. रा. ना. च्या कित्येक कविता वरपांगी विनोदाचा मुखवटा पांघरून आलेल्या असल्या तरी अंतर्यामी माणूस आणि त्यांच्याविषयीच्या अपार उमाळ्याने, कारुण्याने त्या ओल्याचिंब झालेल्या असतात.''[९३] याप्रमाणे 'माझा संभ्रम मिटेल का?' या कवितेत त्यांनी साकारलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील पुढारी व स्वातंत्र्योत्तर काळातील पुढारी यांचे उपरोधिक चित्रण पाहण्यासारखे आहे. विशेषत: आधुनिक पुढाऱ्यांचे उपरोधिक भाषेत त्यांनी केलेले चित्रण जणू एक तिरवट भाष्य आहे. 'मुंबईतील चाळ' आणि 'पावना मी खेड्यामधला' या दोन कविता पाहिल्या तरी रा. ना. पवारांच्या ठायी उत्कट प्रकारची विनोदीवृत्ती कशी होती, याचा प्रत्यय येतो. 'आज नाहीचं का बोलायचे?' या प्रेमकवितेत पती-पत्नीतील शृंगाराचे केलेले चित्रण सूक्ष्म विनोदाचे उदाहरण होय. तसेच संग्रामातील 'चिनी माऊचा बोका', 'दुष्ट शब्द तो नको 'चिनी' ही बालगीते पाहण्यासारखी आहेत.

**सौंदर्यसक्ती व रसिकता :**

रा. ना. पवारांच्या प्रेम कविता पाहिल्या की, या कवीच्या ठिकाणी सौंदर्यावर प्रेम करणारे एक दिलखुलास रसिक व्यक्तिमत्व होते, याचा प्रत्यय येतो. स्त्रीच्या सौंदर्याचे, तिच्या विभ्रमाचे मोहक चित्रण अनेक कवितांतून मुक्तपणे केले आहे. 'रुप तुझं डोळ्यांत', 'स्वर्ग-सुखाचे दोनच क्षण', 'आज पुनवेची रात', 'मी आले आंघोळीला', 'नका गडे गालात हसू', 'सांग कुठे शिकलीस?', 'आज नाहीचं का बोलायचे', 'नजर' या कविता पाहिल्या की त्यांचे सौंदर्यावर लुब्ध होऊन निखळ व शालीन शृंगाराचे वर्णन करण्याचे किती आकर्षण होते, हे जाणवते. त्यातील सूक्ष्म भावाचे अवलोकन करून कौशल्याने काळजातील किंवा हृदयातील भाव हळूवारपणे रेखाटतात. त्यांच्या अशा कवितांतून त्यांच्या प्रेमभावनेची जी उत्कट चित्रे रंगविली आहेत, त्यातून त्यांची रसिकता प्रकट होते.

**आशेचे गीत गाणारा कवी :**

रा. ना. पवारांना वैयक्तिक जीवनात, समाजात, राजकीय क्षेत्रात दुःख, दारिद्र्य, विषमता व स्वार्थीवृत्तीचे डोंब माजलेले जरी दिसत असले तरी त्यांना माणसाच्या मनावर, जीवनावर उत्कट प्रेम आहे.समाजात जी अगतिकता त्यांना समाजात पाहायला मिळते ती कधी तरी संपून जाईल अशी त्यांना आशा आहे. असे त्यांच्या कविता पाहिले की दिसून येते. जोवर जगात माणसाजवळ हृदय आहे तो पर्यंत माणसाच्या अंगात वेगळे बळ आहे, असे त्यांना वाटते. म्हणून डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी 'आशेची गीते गाणारा कवी'[१४] अशा शब्दांत त्यांची प्रशंसा केली आहे. 'तोवर क्रांती अटळ आहे', 'मी हिमालयाचा कडा', 'जीवन', 'जीवनाचे शिल्प', 'मानहानी' या त्यांच्या कविता जीवनवादी व आशेची गीते गाणाऱ्या आहेत.

रा. ना. पवारांच्या समग्र काव्यातील परिशीलन केल्यानंतर असे दिसून येते की, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक गुणविशेष कवितेतून प्रकट झाले आहे. त्यांच्या ठिकाणी असलेले काव्यप्रेम, कुटुंबप्रेम, श्रद्धाशीलता, सामाजिक जाणीव, राष्ट्रीय भावना, सौंदर्यसक्त रसिकमन हे त्यांच्या व्यक्तिमत्वातील गुणविशेष कवितेतून व्यक्त झाले आहे. त्यामुळे त्यांची कविता त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार आहे, असे दिसून येते.

रा. ना. पवारांच्या व्यक्तिमत्वाची विविध पैलू रेखाटणारी 'लक्ष्मीनारायण बोल्ली' यांनी लिहिलेली 'राना'त बहरलेला प्राजक्त' ही कविता पाहण्यासारखी आहे-

''कविता कशी असावी, गाऊन सांगणारा
'राना'त बहरलेला, प्राजक्त शिंपणारा
जनमनातले ते 'राना'त सर्व कांही
सर्वाहुनि अधिक, कानात सांगणारा
बेधुंद मैफलीचा, शाहीर हा निराळा
मनातला तराणा, आळवून झिंगणारा
मंदिरी शारदेच्या, होऊन पायरी तो
घरटे परि स्वतःचे, उन्हात बांधणारा'' [१५]

प्रकरण तिसरे

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | रा. ना. पवार | :- | *'मी आणि माझी कविता'* आकाशवाणी केंद्र, सोलापूर. (का.ना.) |
| २. | निर्मलकुमार फडकुले | :- | *'प्रस्तावना'*, 'सावळ्या विठ्ठला' (पृ.२) |
| ३. | निर्मलकुमार फडकुले | :- | तत्रैव (पृ.१२) |
| ४. | कवी संजीव | :- | *'सावळ्या विठ्ठला'*, दै. केसरी, सोलापूर दि. ३ ऑगस्ट १९८३. |
| ५. | निर्मलकुमार फडकुले | :- | उनि. (पृ.४ व ५) |
| ६. | कवी संजीव | :- | उनि. |
| ७. | निर्मलकुमार फडकुले | :- | उनि. (पृ.२) |
| ८. | निर्मलकुमार फडकुले | :- | उनि. (पृ.८) |
| ९. | कवी संजीव | :- | उनि. |
| १०. | निर्मलकुमार फडकुले | :- | *'कवी रा. ना. रसिक दिलखुलास माणूस'* दै. संचार, सोलापूर दि. २१ जुलै १९८१ |
| ११. | निर्मलकुमार फडकुले | :- | *'प्रस्तावना'*, सावळ्या विठ्ठला (पृ.३) |
| १२. | कवी संजीव | :- | पत्र-१, दि. २१ एप्रिल १९८०. |
| १३. | दिवाकर दुनाखे | :- | *'कविवर्य रा. ना. पवार एक जीवनाभिमुख व्यक्तिमत्व'* |
| १४. | निर्मलकुमार फडकुले | :- | *'आशेची गीते गाणारा कवी, श्री. रा. ना. पवार'* दै. संचार, सोलापूर दि. २१ जुलै १९७२. |
| १५. | लक्ष्मीनारायण बोल्ली | :- | *'राना'त बहरलेला प्राजक्त'* दै. विश्वसमाचार, सोलापूर दि. २१ जुलै. १९८९ |